**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः एएससी-१२२६/प्र.क्र.१५२/प्रशा-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २६ ऑक्टोबर, २०२६

**शासन आदेश**

शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक (गट-क) (सेवा प्रवेश) नियम २०१७, (दिनांक ६ जुन, २०१७) व शासकीय कार्यालयातील लिपिक-टंकलेखक (गट-क) (सेवा प्रवेश) (सुधारणा) नियम, २०२२ (दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२२) अनुसार कलम ३ मधील अटींची पूर्तता करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील खालील गट-ड संवर्गा मधील कर्मचाऱ्यांना सन २०२६-२०२७ च्या निवडसूचीतून लिपिक-टंकलेखक (गट-क अराजपत्रित वेतन स्तर एस-६ - १९९००-६३२००) पदावर या आदेशाव्दारे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून त्यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्रमांक ६ मधील विभागात करण्यात येत आहे.

| अ.क्र. | श्री / श्रीमती | कर्मचाऱ्याचे नाव | कर्मचाऱ्याचा जात प्रवर्ग | सध्याचा विभाग | लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती नंतर पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री | प्रमोद विलास पवार | भज (ब) | नगर विकास विभाग | इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग |
| २ | श्री | कपिल मिलिंद बुडके | खुला | नियोजन विभाग | राजशिष्टाचार विभाग |
| ३ | श्री | स्वराज सुनिल शिलवंत | अजा | नियोजन विभाग | सहकार विभाग |
| ४ | कु. | पूर्वा उमेश कापसे | खुला | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | आदिवासी विकास विभाग |
| ५ | श्री | विवेक दिनेश घाणेकर | इमाव | मृद व जलसंधारण विभाग | माहिती व जनसंपर्क विभाग |
| ६ | श्री | हृषिकेश काशिनाथ संखे | भज (ड) | नियोजन विभाग | कृषि विभाग |

२. उपरोक्त पदोन्नत्या मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदांवर ज्येष्ठतेने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येत आहेत.

३. मागास प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती ही शासन निर्णय दिनांक २५.०५.२००४ मधील तरतूदीनुसार त्यांना आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. संबंधित विभागाने याची खातरजमा करावी.

४. या आदेशान्वये पदोन्नत होणाऱ्या उपरोक्त एकूण ६ कर्मचाऱ्यांविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी सुरु नसल्याचे विभागाने कळविले आहे. तथापि, विभागांनी सदर कर्मचाऱ्यांना लिपिक-टंकलेखक पदावर पदस्थापना देण्यापूर्वी विभागीय चौकशीबाबत खातरजमा करावी.

५. मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमांनुसार पदोन्नत होणारा कर्मचारी अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाला नसेल किंवा त्याला सदर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, सदर कर्मचाऱ्यांना ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. प्रस्तुत कर्मचाऱ्यांनी लिपिक-टंकलेखक पदावरील निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती न स्वीकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.३०३/ कार्यासन-१२, दिनांक १२.०९.२०१६ अन्वये त्यांचे नाव सन २०२६-२०२७ च्या तात्पुरत्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षी (सन २०२७-२८ व सन २०२८-२९) होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत (सन २०२९-३०) लिपिक टंकलेखक पदावरील पदोन्नतीसाठी विचार करण्यात येईल.

७. महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरणातील तरतुदीनुसार पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण घेणे संबंधितांवर बंधनकारक राहील.

८. गट-ड मधून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांमध्ये लिपिक टंकलेखक पदावर रूजू

होणे आवश्यक आहे. संबंधित विभागाने पदोन्नत झालेल्या गट-ड मधील कर्मचाऱ्यांना विहित कालावधीत कार्यमुक्त करावे.

९. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६१०२६१११३०९३००७ असा आहे. हे आदेश डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GAJANAN SAHADEO PARAB

Digitally signed by GAJANAN SAHADEO PARAB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPT, 2.5.4.20=23BC53B7F4F1CA24AD7FDD55B639979816E6E784D75D5396D0F50367308ECC8B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6E3168FC30A0E07A9B8D13F2A24C658F97BA49C1AB3A023B1606696C22202DDD, cn=GAJANAN SAHADEO PARAB
Date: 2026.10.26 11:14:06 +05'30'

**(ग. स. परब)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रतिः-**

गट ड मधील कर्मचारी (संबधित मंत्रालयीन विभागामार्फत)

**प्रत:-**

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, (संबंधित विभाग)(विभागामार्फत)

२. सह सचिव / उप सचिव (आस्थापना), (संबंधित विभाग)

३. संबंधित कर्मचारी (विभागामार्फत)

४. निवडनस्ती / सा. प्र. वि.-प्रशा-३.